प्रकरण - सहावे

उपसंहार व निष्कर्ष

प्रकरण सहावे

उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तावना:

भारताने संघराज्य व्यवस्थेचा स्विकार करून ६० वर्षे झाली. संघराज्यामध्ये २८ घटकराज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश असून आज प्रादेशिक असमतोल व भाषिक अस्मितेच्या आधारावर आणखी काही घटकराज्यांची मागणी तीव्र होत आहे. त्यामूळे भारतीय घटकराज्यांच्या एकात्मतेलाही आव्हान मिळत आहे. १९५० ते ६० च्या दरम्यान भाषावार प्रांतरचना हा मुद्दा पुदे आला आणि एक भाषा, एक राज्य या भावनिक सुत्रावर आधारित राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यानंतरच्या काळात भाषावार प्रांतरचनेची संकल्पना मागे पडली आणि अर्थिक विकासाच्या आधारावर स्वतंत्र राज्याची मागणी पूढे आली. त्यातून २000 साली झारखंड, उत्तरांचल व छत्तीसगड या राज्यांची निर्मिती झाली. त्याचप्रमाणे आज एकाच भाषिक प्रांतातून आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर तेलंगणा, विदर्भ, बोडोलॅंड, इ. स्वतंत्र राज्याची मागणी होत आहेत. त्यामुळे संघराज्यिय एकात्मतेला आव्हान मिळाले आहे, संघराज्यासमोरील या आव्हानांवर उपाययोजना करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकाच भाषिक समुहाची दोन किंवा तीन राज्ये करावीत, परंतू ती करताना त्याचा समतोल विकास केला जावा अशी भूमिका मांडली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही भूमिका आजच्या संदर्भात औचित्त्यपूर्ण ठरत आहे. म्हणूनच प्रस्तुतत लघू शोधप्रबंधामध्ये आजच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यपुनर्रचनेसंबधी विचार कसे संयुक्तीक आहेतत याचा अभ्यास केला आहे. त्याचा उपसंहार पुढीलप्रमाणे

अ) उपसंहार

प्रकरण पहिले : प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये भारतात भाषावार प्रांतरचनेची सुरवात कधीपासून झाली आणि त्याचे स्वरूप कसे बदलले, तसेच घटकराज्याची निर्मिती भाषेच्या आधारावर कशी झाली याचे विवेचन करण्यात आले आहे. तसेच आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर नवीन राज्यांची निर्मिती झाली, याचे थोडक्यात विवेचन केले आहे. भाषा हा मानवी जीवनाच्या प्रगतीतील महत्त्वाचा घटक आहे. भाषा व राज्य यांच्यातील

संवधाचा विचार करताना, घटकराज्यामध्ये एकत्र भावनेने वांधण्यासाठी भाषेची गरज असते. परंतू संघराज्य निर्मितीसाठी भाषा हा अनेक घटकापैकी केवळ एक घटक आहे. राष्ट्रवाद ही भावना निर्माण करण्यासाठी भाषा ही महत्त्वाची ठरते. एक भाषा एक राज्य हे तत्व यूरोपमधील राष्ट्रवादास उपयुक्त ठरले, परंतु वहुभाषिक समाजामध्ये ते तत्व महत्त्वाचे नसून, इतर घटकही महत्वाचे असतात, या विचारांचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे. त्याचवरोवर संशोधनाची उद्दिष्टये] या विषयावर संशोधन करण्यामागील हेतू आणि त्याचे महत्व काय आहे हे जाणून घेऊन शोधप्रवंधासाठी ज्या संशोधन पद्धतीचा अवलंव केला आहे, त्याचा सविस्तर आढावा घेतला आहे.

प्रकरण दोन : भाषावार प्रांतरचनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतातील भाषिक गटांचा उदय व विकास प्रामुख्याने इंग्रजांच्या कारकिर्दीत झाला, तरी भारतामध्ये विविध भाषा वोली भाषा, वोलणा-या भारतीय समाजात एकतेची जाणीव होती. पूढे वंगालच्या फाळणीनंतर भाषिक समूह एकत्र येऊ लागले आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषेसंवधी जनतेच्या भावना इतक्या तीव्र होत्या की, त्यापुढे नेहंरूसारख्या नेतृत्वालाही पुर्नविचार करावा लागला. त्यामुळे लोकांच्या भावनिकतेचा विचार करून १९५६ साली भाषावार प्रांतरचनेनुसार घटकराज्याची निर्मिती करण्यात आली. परंतू स्वतंत्र राज्याची मागणी थांवली नाही. पुन्हा भाषिक. वांशिक अस्मितेतून राज्याची मागणी वाढतच राहीली. परंतु पूढे भाषावार राज्यरचना ही संकल्पना मागे पडून आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर घटकराज्यांची मागणी वाढत राहीली. त्यातुनच इशान्येकडील राज्ये निर्माण झाली. त्याचवरोबर २000 साली झारखंड. उत्तरांचल व छत्तीसगड या राज्याची निर्मिती झाली. अशा पकारे भारतीय संघराज्याच्या जडणघडणीचा आणि घटकराज्याच्या निर्मितींचा ऐतिहासिक आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे : डॉ. बाबासाहेब आंबेडकराची भाषावार प्रांतरचनेविषयी विचार

तिस-या प्रकरणात डॉ. वावासाहेव आंवेडकराच्या भाषावार प्रांतरचनेविषयीच्या संपूर्ण विचारांचा अभ्यास केला आहे. एक राज्य एक भाषा या तत्त्वांच्या आधारे राज्यांची निर्मिती करावी असे सुचविले. राष्टीय एकात्मतेच्या दृष्टीने विचार करून केवळ भाषावार प्रांतरचना करू नये, ही भाषावार प्रांतरचनेच्या विरोधातील तात्त्विक भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे. त्याचवरोबर भाषावार प्रांतरचनेनमुळे बहूसंख्याक जातीचे वर्चस्व अल्पसंख्याकावर निर्माण होऊन, त्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते, त्यामुळे स्वतंत्र

मतदारसंघाची योजना केली जावी असे त्यांनी सांगितले. राज्य निर्माण करताना आर्थिक स्वयंपूर्णतेचा विचार केला जावा असेही त्यांनी सुचविले. उत्तर भारत आणि दक्षिण भारतातील राष्ट्रभाषेमुळे जो संघर्ष आहे तो मिटवण्यासाठी दुस-या राजधानीची योजना डॉ. आंबेडकरांनी सांगितली, अशारीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषावार प्रांतरचनेबद्दलच्या विचांराचा आढावा येथे घेतला आहे.

प्रकरण चौथे : डॉ. आंबेडकरांचे महाराष्ट्राबद्दलचे विचार

प्रस्तूत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्र हा भाषीक प्रांत व्हायलाच पाहिजे यासाठी जो युक्तीवाद केला त्याचा अभ्यास केला गेला आहे. महाराष्ट्र एकात्म की सघांत्म हे दोन विचार प्रवाह असताना महाराष्ट्र एकात्म असले पाहिजे, तसेच मुंबई शहर हे महाराष्ट्राचा एक भाग आहे, ते इतर कोणाचे होऊ शकत नाही, अशी भुमिका डॉ. आंबेडकरानी घेतली. पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबई ला लोक येतात, त्यांना मुंबईत समाविष्ट करणे धोक्याचे आहे. कारण मुंबई त्यांना आपली वाटत नाही, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले आहे. परंतु महाराष्ट्र संयुक्त की विभक्त या पZश्नासंबधी मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेगळी भुमिका घेतली. महाराष्ट्र हे मुंबई राज्य, विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र अशा चार राज्यात विभागले जावे असे त्यांनी सुचविले. परंतू ही त्यांची सूचना लोकांना मान्य झाली नाही. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संयुक्त महाराष्ट्राला पांठीबा दिला. अशारीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परिस्थितीनुसार आपली भूमिका बदललेली दिसून येते. या सर्व गोष्टींचा परामर्श या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण पाचवे : भाषावार प्रांतरचना : महाराष्ट्रातील सद्यकालीन परिस्थिती

पाचव्या प्रकरणात मुंबईमधील भाषिक अस्मितेच्या आधारावर सुरू असलेले संघर्ष, त्यातून निर्माण झालेल्या मराठी-अमराठी संघर्षाला शिवसेना, मनसे पाठवळ देत आहेत, त्यामुळे महाराष्ट्राच्या एकात्मतेला आव्हान मिळू लागले आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्वकाळापासून विदर्भाचा स्वतंत्र मागणीचा लढा कशारीतीने उभा राहीला. आज विदर्भात कोणते प्रश्न आहेत. विदर्भाला महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी अकोला करार व नागपूर करार करण्यात आला. त्यामध्ये कोण्त्या तरतुदी आहेत. तसेच स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीचे स्वरूप कसे आहे इ. सर्व गोष्टींचे विश्लेषण प्रस्तूत प्रकरणात करण्यात आले आहे.

ब) निष्कर्ष

भारताच्या स्वातंत्र्यानंतर संघराज्याची स्थापना होणे अपरिहार्य होते, याची दोन कारणे होती. एक; भारताचा भुप्रदेश व्यापक आहे. दुसरा; ब्रिटीश कालखंडात भिन्न प्रांताची रचना ब्रिटीशांनी प्रशासकीय सोयीसाठी केली होती. परंतु भारतीय संघराज्याची निर्मिती कोणत्या आधारावर करावी हा कळीचा मुद्दा होता. भारतीय समाजाचे महत्वपूर्ण वैशिष्ट आहे ते म्हणजे, येथील भाषिक विविधता त्या त्या भाषिक समूहांचा स्वतंत्र इतिहास, त्यांची संस्कृति व त्यांचे जिवनमान यामुळे भाषिक समूह हे भारतातील एक एकक म्हणून अस्तित्वात होते. याचे भान असल्यामुळेच स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या पक्षीय समित्या भाषिक तत्वाच्या आधारावर केल्या होत्या. भारतीय संघराज्याची निर्मिती ही त्याचतत्वाच्या आधारावर होईल अशी अपेक्षा होती. परंतु भाषेच्या आधारावर राज्यपुनर्रचना झाल्यास भारतीय एकात्मतेला धोका निर्माण होईल असा विचार मांडला जाउ लागला. सरकारचे नेतृत्व करणा-या पंडित नेहरूंची ही तीच भावना होती. त्यामुळेच भाषिक प्रांत रचनेचे तत्व भारत सरकार स्विकारावयास तयार नव्हते. परंतु भारतातील विविध भाषिक समूहांमध्ये आपले भाषिक राज्य व्हावे ही भावना तीव्र झाली होती. त्याचाच परिपाक म्हणून तेलगू भाषिकांनी स्वतंत्र राज्यासाठी आंदोलन सुरू केले आणि १९५३ साली आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती झाली. आंध्रप्रदेश राज्याच्या निर्मितीने इतर भाषिक समूहांमध्येही भाषिक राज्याची भावना तीव्र झाली आणि सर्वत्रच त्यासाठी आंदोलने सुरू झाली. अंतिमत: भारत सरकारला त्यासाठी एक आयोग नेमावा लागला. फजल अली कमिशनच्या शिफारशींच्या आधारावर १९५६ चा राज्यपुनर्रचना कायदा झाला आणि अ, ब, क, ड अशी विभागणी असणा-या संघराज्य व्यवस्थेचे रूपातंरण १४ घटक राज्य व ६ केंद्रशासित प्रदेशांमध्ये झाले. बहुतांश राज्यांची निर्मिती भाषिक तत्वावर निर्माण करण्यात आली. परंतु मुंबई हे द्विभाषिक राज्य असल्यामुळे मराठी आणि गुजराती भाषिकांनी अनुक्रमे संयुक्त महाराष्ट्र समिती आणि गुजरात महासभा यांच्या आंदोलनाद्वारे स्वतंत्र राज्याची मागणी केली. १९६० साली मुंबईसह महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य तयार झाले.

स्वातंत्र्यानंतर पहिल्या दोन दशकामध्ये भारतीय संघराज्याची जडणघडण कशी करावी, यासंबधी मोठया प्रमाणात विचारमंथन झाले होते. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी केवळ भाषावार प्रांतरचनेसंबधीच नव्हे तर महाराष्ट्राच्या निर्मितीसबंधीही चिंतन केले, आपले

विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ख-या अर्थाने द्रष्टे होते. त्यांना भारतीय समाजाची व येथील अर्थ कारणाची पक्की जाण होती. म्हणूनच त्यांनी यासंबंधीचे जे विचार मांडले ते सद्यकाळात ही उपयुक्त असल्याचे दिसते. सध्या भारतात संघराज्य एकात्मतेपुढे आव्हान निर्माण झाले आहे. एक भाषा, एक राज्य हे तत्व स्विकारूनही राज्याचा समतोल विकास झाला नसल्याचे चित्र पुढे आले आहे. अनेक राज्यामधील हे वास्तव आहे. त्यामुळे त्या त्या प्रदेशातील लोकांचे स्वतंत्र राज्याची मागणी पुढे येत आहे. त्याचाच परिपाक म्हणून २000 साली छत्तीसगड, उत्तरांचल आणि झारखंड या राज्याची निर्मिती करण्यात आली. आज तशाच प्रकारची मागणी विदर्भ, तेलंगणा, सौराष्ट्र, गोरखालॅंड या प्रदेशातूनही होत आहे. एकाच भाषिक राज्यात एकापेक्षा अधिक राज्य निर्माण करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेसंबंधी आपले विचार मांडताना एक भाषा, एक राज्य या ऐवजी एक राज्य, एक भाषा हे तत्व मांडले. त्यांच्यामते, एकाच भाषिक समूहाची एकापेक्षा अधिक राज्य करता येणे शक्य आहे. कारण भारतीय संघराज्याची एकात्मता टिकवायची असेल तर प्रत्येक घटकराज्याचा समतोल विकास झाला पाहिजे, संघराज्यामध्ये प्रत्येक घटकराज्य स्वयंपूर्ण असले पाहिजे. प्रत्येक घटकराज्याचा समतोल विकास झाला पाहिजे. अन्य घटकापेक्षा घटकराज्याचा समतोल विकास हाच संघराज्याच्या एकात्मतेला उपकारक ठरू शकतो याचे भान डॉ. आंबेडकरांना होते. भाषेच्या आधारावर निर्माण होणारी भारतातील राज्ये विस्ताराने मोठे असल्यामुळे त्याच्यांत प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता आहे हेही डॉ. आंबेडकर जाणून होते. शिवाय एकाच भाषिक राज्यात, भिन्न प्रदेशातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ भिन्न आहेत, त्यामुळे त्यांचा विकासाचा टप्पाही भिन्न आहे, यांची ही जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. उदा. हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक प्रांताचा विकास मुंबई प्रांताच्या तुलनेमध्ये कमी झालेला आहे, तो प्रदेश मागासलेला आहे हे आंबेडकराना चांगले ठाऊक होते. या पर्श्व भूमीवरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका भाषिक प्रदेशाची एकापेक्षा अधिक राज्ये करावीत अशी शिफारस करतात. भारतामध्ये २000 साली अस्तित्वात आलेली तीन राज्ये आणि विदर्भ, तेलंगणासारख्या होणा-या राज्याची मागणी डॉ. आंबेडकरांच्या वक्तव्याची प्रचीती देणारी उदाहरणे आहेत. या संदर्भात हे लक्षात घेणे गरजेचे आहे की भाषावार प्रांतरचनेसंबंधी विचार करताना डॉ. आंबेडकरांनी असे मत मांडले होते की, उत्तरप्रदेशाची तीन, बिहारची दोन, मध्य प्रदेशाची दोन राज्ये निर्माण करावीत.

भाषावार प्रांतरचनेसंबंधी मत मांडताना समतोल घटकराज्याची निर्मिती केली गेली जावी, प्रत्येक घटकराज्याचा भौगोलिक विस्तार आणि त्याची लोकसंख्या सर्वसाधारण सारखे असावे असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले होते.विस्ताराने आणि लोकसंख्येने मोठी असणारी राज्ये भारतीय संघराज्यात आपले वर्चस्व निर्माण करतील, अशी भिती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केली होती.गेल्या साठ वर्षाच्या भारतीय राजकारणाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास त्यांचे हे मत खरे झाल्याचेच दिसते.उत्तर प्रदेशसारखे मोठे राज्य भारतीय राज्कारणात नेहमीच आपले प्रभूत्व निर्माण करत राहिले आहे.समतोल घटकराज्यांबरोबरच राज्ये लहान असावीत अशीही सूचना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली होती.

लहान राज्य केली की, ती स्वयंपूर्ण राहतील असे ते म्हणतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे वक्तव्य किती संयुक्त होते, हे आज निदर्शनाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले होते उत्तरप्रदेशाची तीन, बिहारची दोन, मध्य प्रदेशाची दोन राज्ये निर्माण केली जावीत,त्यांची प्रचिती सन २000 साली आली.उत्तरप्रदेशमधून उत्तरांचल राज्याची निर्मिती करण्यात आली. बिहारमधून झारखंड राज्य आणि छत्तीसगड राज्याची निर्मिती मध्यप्रदेशमधून करण्यात आली.

भाषावार प्रांतरचनेसंबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आणखी एक महत्वपुर्ण मत मांडला. ते म्हणतात मोठे राज्य निर्माण झाले तर त्यामुळे तेथील घटकराज्यात बहुसंख्यांक जातीचे वर्चस्व निर्माण होईल, त्यातून अल्पसंख्यांक जातीची गळचेपी होईल, हे टाळण्यासाठी लहान राज्ये निर्माण केली पाहिजेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संघराज्याच्या पुर्नमांडणीचा विचार करताना केवळ भाषा आणी आर्थिक विकास याच तत्वांच्या आधारे करत नाहीत तर भारतीय जातिव्यवस्थेची पक्की जाण असल्यामुळे ते या प्रश्नाचा जातीच्या संदर्भात ही विचार करतात. प्रत्येक भाषीक समूहांमध्ये जातीची एक विशिष्ट उतरंड असते.भाषीक राज्याचे तत्व स्विकारल्यास या उतरंडीतील उच्च जाती त्या राज्याचा राजकारणावर आपले प्रभूत्व निर्माण करतील हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाणले होते.गेल्या साठ वर्षाचा आढावा घेता, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे मत प्रत्यक्षात उतरलेले दिसते. उदा. महाराष्ट्रात मराठा, आंध्रप्रदेशामध्ये रेड्डी व कम्मा, कर्नाटकात लिंगायत व वक्कलिंगा यांचे वर्चस्व असलेले आज आढळून येते.कोणत्याही एका जातीचा किंवा जाती समूहाचे वर्चस्व लोकशाहीला बाधक असते. त्यामुळेच डॉ.बाबासाहेब

आंबेडकरांनी मोठया राज्यांऐवजी लहान राज्याचा स्विकार केला जावा अशी भूमिका घेतली. आजच्या संदर्भात ही भूमिका ही अधिक संयुक्तीक असल्याचे दिसते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेसंबधी आपली मते मांडताना महाराष्ट्राचा विचार अधिक खोलातून जाऊन केला.१९४८ ते १९५६ या कालखंडात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या संबधामध्ये आपली मते निवेदनाद्वारे, पुस्तकाद्वारे, लेखाद्वारे मांडली.१९४८ साली 'महाराष्ट्र हे भाषिक राज्य' या निवेदनामध्ये मुंबई हा महाराष्ट्राचा भाग असून महाराष्ट्र हा एकात्म असला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. परंतु १९५५ साली 'भाषावार प्रांतरचनेवरील विचार', या पुस्तकामध्ये महाराष्ट्राचे चार भाग करावेत असे त्यांनी स्पष्ट केले.पुढे १ मे १९५६ रोजी राज्यसभेत महाराष्ट्राची तीन राज्ये करण्याची सूचना त्यांनी केली, त्यामुळे त्यांच्यावर मोठया प्रमाणात टिका करण्यात आली.त्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी १९ मे १९५६ रोजी लोकसत्ता दैनिकामध्ये त्यांनी असे म्हटले की, महाराष्ट्राची निदान दोन राज्ये तरी निर्माण करा, हे जर तुम्हाला मान्य होत नसेल तर प्रथम मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा तरी विचार करावा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची महाराष्ट्रासंबधीची भूमिका प्रत्येकवेळी कालनुरूप विस्तारत गेली असली तरी त्यांनी जी भूमिका मांडली, ती भूमिका आणि त्याचे सद्यकालीन औचित्य सुत्ररूपाने मांडता येईल. ते पुढीलप्रमाणे :

१.मुंबई हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वारंवार आधोरेखित केले.मुंबईमध्ये गुजराती भाषिकांचे प्राबल्य का वाढले याचे विवेचन करताना ते म्हणतात ईस्ट इंडिया कंपनीने मुंबईचा व्यापार वृध्दिंगत करण्यासाठी गुजराती भाषिकांना येथे आणले, त्यामुळे त्यांची संख्या येथे वाढली असली तरी मुंबई ही मुळ मराठी भाषिकांची आहे.मुंबई व महाराष्ट्राचा अनोन्यसाधारण संबध आहे हेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आधेरेखित केले आहे.शिवाय कलकत्ता, मद्रास या शहरांप्रमाणे मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करता येणार नाही असेही मत ते मांडतात. मुंबई आर्थिक राजधानी असली तरी भारतातील इतर प्रांतामधून येणा-या लोढयांवर नियंत्रण आणण्यासाठी एखादा कायदा असता तर या लोढयांवर नियंत्रण आणता आले असते असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटते. शिवाय अन्य प्रांतांमधून येणा-या लोकांना मुंबई आपलीशी वाटत नाही हे वास्तव ही ते सांगतात.पन्नास वर्षापूर्वी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती संयुक्त झाली, परंतु मुंबईसह महाराष्ट्राची मागणी संयुक्त महाराष्ट्र चळवळीने ज्या

कारणासाठी केली ते कारण मागे पडले आहे. मुंवई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असल्यामुळे या दोहोच्या परस्पर समन्वयातूनच महाराष्ट्राचा विकास होईल. यादोहोंमध्ये एक भावनिक ऐक्य निर्माण होईल अशी अपेक्षा होती, परंतु नेमके याच्या उलट घडले. मुंवई महाराष्ट्रातून अलग पडत गेली. मुंवईतील मराठी भाषिक मुंवईच्या मुख्य प्रवाहापासून दुर होत गेले आणि मुंवईवर अन्य प्रांतियांचे वर्चस्व निर्माण झाले, त्यातून मराठीपण ही हरवून गेले. मुंवईतील मराठी तरूणांपुढे रोजगाराचे प्रश्न उभे राहिले. या सर्व प्रश्नांवर शिवसेना आणि मनसेने मराठी-अमराठीचा मुद्दा उपस्थित करून मुंवईतील मराठी भाषिकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यातून काही प्रमाणात मराठी अमराठीच्यामध्ये तेढ आणि द्वेष निर्माण झाला. वास्तविकत: भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीयांना भारतात सर्वत्र वास्तव्य करण्याचा, नोकरी करण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे मुंवईत भारतातील कोणत्याही भागातील लोक येऊ शकतात, रोजगार, उद्योग करू शकतात स्थायिक होऊ शकतात. हे सर्व वास्तव असले तरी मुंवईत आलेल्या अमराठी भाषिकांनी इथल्या भूमिपुत्रांपुढे आव्हान निर्माण केले त्यांच्या रोजगाराच्या संधी कमी केल्या. शिवाय डॉ. वावासाहेव आंवेडकर म्हणतात त्याप्रमाणे परप्रांतीयांना मुंवई आपलीशी वाटत नाही. त्यामुळेच दुस-या वाजुने विचार करता शिवसेना आणि मनसेने मुंवईसंवधी उपस्थित केलेले प्रश्न योग्य असल्याचे दिसते. मुंवई मध्ये येणा-या लोढयांवर नियंत्रण आणण्यासाठी काही कायदा असला पाहिजे ही त्यांची मागणी डॉ. वावासाहेव आंवेडकरांच्या विचाराशी सुसंगत असल्याचे दिसून येते. मुंवईत येणा-या लोढयांमुळे मुंवईची अस्मिता धोक्यात येत आहे, इथल्या भुमिपुत्रांपुढे रोजगाराचे आव्हान निर्माण झाले आहे. परंतु त्याहीपेक्षा मुंवईतील नागरी सेवांवर प्रचंड मोठया प्रमाणात दवाव येत आहे, मुंवईचे वकालीकरण होत आहे. या पार्श्व भूमीवर डॉ. वावासाहेव आंवेडकरांची भूमिका निश्चितच संयुक्तीक आहे. मनसेनेही डॉ. वावासाहेव आंवेडकरांच्या या भूमिकेला उचलून घेतल्याचे आढळते. उदा. ३ मे २००८ रोजी शिवाजी पार्कवर झालेल्या जाहीर सभेत मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुस्तकातील उतारे वाचून दाखवले.

२. स्वातंत्र्यापासून विदर्भ राज्याची मागणी होत होती, परंतु ती मान्य झाली नाही. महाराष्ट्रात विदर्भ सामील करताना विदर्भाचा विकास होईल व त्यासाठी खास तरतुदी करण्यात येतील असे आश्वासन त्या काळातील नेत्यानी दिले. परंतू प्रत्यक्षात त्यांचा विकास झाला नाही. आज कित्येक शेतकरी येथे आत्महत्या

करत आहेत, कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. विदर्भाचा अनुशेष वाढत आहे. उद्योग, रोजगारामध्ये वाढ होत नाही, त्यामुळेच आज स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी अधिक जोरदारपणे होत आहे. आम्ही आमचा विकास करू अशी भूमिका तेथील जनता व नेत्यांची आहे. आज स्वतंत्र विदर्भ संघर्ष समितीच्या माध्यमातून जांबुतराव धोटे, विलास मुत्तेमवार इ. नेत्यांनी मागासलेपणाच्या आधारावर स्वतंत्र विदर्भाची मागणी केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही महाराष्ट्राचे चार भाग करून त्यामध्ये विदर्भाला स्वतंत्र राज्याचा दर्जा द्यावा असे स्पष्ट केले होते. विदर्भ हा पूर्वीपासून स्वतंत्र राहिलेला आहे, त्यामुळे त्यास स्वतंत्र राज्याचा दर्जा द्यावा असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले होते. एक राज्याची एकभाषा असली पाहिजे आणि एका भाषेचे अनेक राज्ये असले तरी चालेल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत विदर्भ राज्य निर्माण होण्यास पाठबळ देणारे आहे.

३. महाराष्ट्रात विदर्भाबरोबरच मराठवाडाही मागास राहिलेला आहे. कारण तो प्रदेश स्वातंत्र्यापूर्वी निजामाच्या अंमलाखाली होता, त्यामुळे त्याचा विकास झाला नाही. आज तेथील नेतृत्वाचे महाराष्ट्राच्या राजकारणात वर्चस्व राहील्यामुळे काहीप्रमाणात विकास झाला आहे. परंतु तेथील नेते व जनता, विदर्भ जर स्वतंत्र होत असेल तर आम्हाला ही स्वातंत्र्य द्या. अशी मागणी करीत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे मत मांडले की, मराठवाडा इतका मागासलेला आहे की पुणे विद्यापीठाच्या परिक्षेत मराठवाड्याचा एक तरी मुलगा उत्तीर्ण होईल की नाही यांची शंकाच आहे. अशाप्रकारे मराठवाड्यात शिक्षणाचा प्रसार झालेला नाही, असे स्पष्ट मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केले होते. आजही मराठवाड्यामधील शिक्षणव्यवस्थेचा मुंबई, पुणेच्या तुलनेत विचार केल्यास तेथे शिक्षणाचा विकास झाला नसल्याचे आढळते. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा अजूनही अप्रगतच आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्यातील लोकांना त्याकाळी दिलेला सल्ला की, तुम्ही स्वतंत्र राज्याची मागणी करा तेव्हाच तुमचा विकास होईल, अधिक औचित्यपूर्ण वाटतो

४. १९६० ला संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर बेळगाव, कारवार व निपाणी हा मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकास जोडण्यात आला. त्या प्रदेशासाठी त्यानंतरअनेकदा आंदोलने झाली. तेथील सिमाभागातील लोकांच्या भावना तीव्र बनल्या आहेत. त्यांनी महाराष्ट्रात येण्याची वारंवार मागणी केली आहे. महाराष्ट्र

एकीकरण समितीच्या माध्यमातून हा प्रदेश महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न होत आहे. हा वाद अजूनही संपला नाही. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बेळगाव, कारवार व निपाणी हा मराठी भाषिकांचा प्रदेश महाराष्ट्राला मिळालाच पाहिजे अशी भूमिका घेतली होती. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका आजच्या संदर्भात बेळगाव, कारवार व निपाणी प्रश्न मिटवण्यास पाठबळ देणारी आहे.